महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,
एलफिन्स्टन, मुंबई ४०००१३. दूरध्वनी:२४३०६७१७/२४२२७७५८/२४३६०७३८


जा.क्र.:सीओ:कार्यक्रम:२०१२-२०१३: ६६३ दिनांक २८.०६.२०१२

परिपत्रक :

विषय :- नाट्य प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्याबाबत.

या परिपत्रकानुसार सर्व विभागप्रमुखांना कळविण्यांत येते की, मंडळाच्या अनेक उपक्रमांपैकी " नाट्यस्पर्धा " ही सातत्याने चालत आलेली लोकप्रिय अशी योजना/ उपक्रम आहे. मंडळाची ही नाट्यस्पर्धा अधिकाधिक लोकप्रिय व्हावी यासाठी मंडळ नेहमी प्रयत्नशिल आहे. मंडळाच्या नाट्य प्रशिक्षण शिबीरा पाठीमागे नवोदित कलावंतांना नाट्यकलेची संधी उपलब्ध व्हावी. त्यांना नाट्यस्पर्धेत भाग घेता यावा चांगले काम/भूमिका प्रदर्शित करता यावी हा हेतू मंडळाचा आहे.त्यासाठी मंडळाच्या सर्व अधिका-यांना सूचित करण्यात येते की प्रत्येक विभागीय स्तरावर १ ऑगस्ट,२०१२ते ३० सप्टेंबर,२०१२ या दरम्यान कमीत कमी १ आठवड्यासाठी नाट्यप्रशिक्षण शिबिरा( सात दिवस ) आयोजित करावे.

त्यासाठी खालील बाबी प्रामुख्याने विचारात घ्याव्यात.

१)नाट्य प्रशिक्षण शिबीर आयोजित करतांना त्यामध्ये मंडळाच्या नाट्यस्पर्धेत भाग घेणा-या कलावंतांना व नवोदितांना प्रशिक्षणार्थी म्हणून प्रवेश देण्यात यावा.

२)केंद्र प्रमुखांना नाट्य प्रशिक्षणासाठी आपल्या केंद्राच्या नाट्य संघातील कमीत कमी २ व जास्तीत जास्त ५ पुरुष कलावंताना पाठवावे.

३)महिला कलावंतांना प्रशिक्षणासाठी पाठवितांना केंद्र प्रमुखांना संख्येचे बंधन राहणार नाही. त्यामुळे महिला कलावंतांना देखील मंडळाच्या शिबीरात सहभागी करुन घ्यावे.

४)विभाग प्रमुखांनी या शिबीरासाठी आपल्या विभाग परिसरातील तज्ञ शिबीर संचालकाची नियुक्त करावी. तसेच वक्ते म्हणून ज्यांना नेमावयाचे आहे अशांची शिबीर संचालकाच्या सोबत चर्चा करुन वक्ते व त्यांचे विषय निश्चित करावे.

५)नाट्य प्रशिक्षण शिबीर हे शक्यतो निवासी असावे. ते शक्य नसल्यास स्थानिक परिस्थितीनुसार ठरविण्यात यावे.

६)शिबीर संचालकाचे मानधन आणि व्यक्त्यांचे मानधन व इतर खर्च इत्यांदीचा सविस्तर खर्चाचा प्रस्ताव मध्यवर्ती कार्यालयास पाठवावा.

वरीलप्रमाणे सर्व कार्यक्रमाचे नियोजन करावे.

कल्याण आयुक्त

प्रत:

१)सहायक कल्याण आयुक्त,म.का.मुंबई/ठाणे/नागपूर/ /पुणे/ अकोला

२)प्र.सहायक कल्याण आयुक्त, नाशिक /औरंगाबाद.